**ठळक बातम्या**

- वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर/ सभापती ओम बिरला यांनी केली त्रिसदस्यीय समितीची घोषणा

- ‘एक देश- एक निवडणूक’ विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल सादर करण्यासाठी लोकसभेने दिली मुदतवाढ

- राज्यात १५ हजार पोलीस भरती करायला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- जागतिक वेगवान बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताची ग्रँडमास्टर दिव्या देशमुख उपान्त्य फेरीत दाखल

**<><><><>**

वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना पदावरुन हटवण्यासाठी महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव आज लोकसभेत सादर झाला. सभापती ओम बिरला यांनी सांगितलं की, महाभियोग चालवण्याचे १४६ सदस्यांचे प्रस्ताव सभागृहाला मिळाले आहेत….

\- **- होल्ड- बाईट- ओम बिरला - -**

न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरच्या आरोपांचं गंभीर स्वरुप लक्षात घेऊन त्या प्रकरणी चौकशीसाठी तीन सदस्यांच्या समितीची घोषणा सभापतींनी केली. त्यात सर्वोच्च न्यायलयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश महिंद्र मोहन श्रीवास्तव आणि ज्येष्ठ विधिज्ञ बी. व्ही. आचार्य यांचा समावेश आहे.

न्यायमूर्ती वर्मा दिल्ली उच्च न्यायालयात पदावर असताना त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर रोकड आढळल्यानंतर त्यांच्या विरुद्ध महाभियोग चालवण्याची चर्चा सुरु झाली आहे.

**<><><><>**

‘एक देश- एक निवडणूक’ विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल सादर करण्यासाठी लोकसभेने मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार हा अहवाल आता संसदेच्या

हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यातल्या पहिल्या दिवशी सादर करता येईल. भारतीय जनता पक्षाचे खासदार पी पी चौधरी यांनी आज लोकसभेत हा प्रस्ताव मांडला होता.

**<><><><>**

लोकसभेच्या सभागृहाचं कामकाज आज सुरु झाल्यावर विरोधकांनी बिहार मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षणाच्या मुद्द्यावर चर्चेची मागणी केली होती. प्रश्नोत्तरांच्या तासात विरोधकांच्या घोषणा सुरु झाल्यामुळे सभापती ओम बिर्ला यांनी प्रथम दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दुपारी ३ वाजेपर्यंत सभागृह तहकूब केलं.

गोंधळ सुरु असतानाच ग्रामीण विकास राज्यमंत्री चंद्रशेखर पेमसेनी यांनी ‘प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण’ अंतर्गत सुरु असलेल्या घरांच्या बांधकामाबद्दलच्या प्रश्नाला उत्तर दिलं. केंद्र सरकारने या योजनेअंतर्गत ४ कोटी १२ लाख घरांच्या बांधकामाला मंजुरी दिली असून आतापर्यंत त्यातल्या २ कोटी ९० लाख घरांचं बांधकाम पूर्ण झाल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यसभेतही बिहार मतदार याद्यांच्या पुनरिक्षणाचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केला होता. न्यायप्रविष्ट मुद्द्यांवर सदनात चर्चा करता येणार नाही अशी भूमिका घेत उपाध्यक्ष हरिवंश यांनी विरोधी पक्षांच्या सदस्यांना शांत राहण्याची विनंती केली. परंतु घोषणा आणि गोंधळ सुरूच राहिल्यामुळे त्यांनी सभागृह दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केलं.

दरम्यान, विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने आजही संसदभवन परिसरात निवडणूक आयोगाच्या निषेधात निदर्शनं केली.

**<><><><>**

बिहारमधल्या मतदार याद्या पुनरीक्षणावर हरकती मागवल्याच्या बारा दिवसांच्या कालावधीत एकाही राजकीय पक्षाकडून हरकत किंवा दावा दाखल केला गेला नाही, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. तर मतदारांनी १३ हजार ९७० दावे आणि आक्षेप नोंदवले आहेत, असं निवडणूक आयोगानं सांगितलं.

दरम्यान, हे पुनरिक्षण रद्द करावं अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू झाली आहे.

**<><><><>**

देशाच्या एकतेचं निदर्शक असलेल्या हर घर तिरंगा अभियानानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. ठिकठिकाणी तिरंगा ध्वज घेऊन पदयात्रा काढण्यात येत आहेत तसंच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत.

**पालघर** जिल्ह्यात वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात या अभियानाअंतर्गत पालिकेच्या क्रीडा विभागानं तिरंगा दौड आयोजित केली होती. यात शालेय विद्यार्थी, धावपटूंनी भाग घेतला. यावेळी ३० फूट लांबीचा तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थी आणि उपस्थितांनी देशभक्तीपर घोषणा दिल्या. याखेरीज तिरंगा ध्वज, राष्ट्रीय स्वातंत्र्य दिनासंबंधी आवश्यक इतर वस्तू तसंच तिरंगा संकल्पनेपासून प्रेरित विविध वस्तूंचं विक्री प्रदर्शनही ठेवण्यात आलं आहे.

**नांदेड** जिल्ह्यात आज हर घर तिरंगा अभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालयात स्वच्छता अभियानाचा प्रारंभ झाला. या अभियानात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसंच महापालिका अधिकाऱ्यांनीही सहभाग नोंदवला.

**<><><><>**

येत्या स्वातंत्र्यदिनी  रायगड जिल्ह्यात शासकीय ध्वजारोहणाचा मान कोणाला मिळणार? याबाबतची उत्सुकता आता संपली असून महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते 15 ऑगस्ट रोजी अलिबाग येथे ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

**<><><><>**

राज्याच्या पोलीस दलात सुमारे १५ हजार शिपाई भरती करायला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यातल्या रास्त भाव दुकानदारांच्या नफ्यात वाढ करण्याचा  निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला. आता या दुकानदारांना प्रतिक्विंटल दीडशे ऐवजी १७० रुपये फायदा मिळेल. सोलापूर - पुणे मुंबई हवाई  मार्गासाठी व्यापारी तूट भरुन काढण्यासाठी निधी देण्याचा निर्णयही आज झाला. याशिवाय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाअंतर्गत येणाऱ्या महामंडळांतर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतल्या जामीनदारीच्या अटी शिथिल करायला आणि शासन हमीला पाच वर्षांची मुदतवाढ द्यायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

<><><><>

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या प्रतिनिधी मंडळाने आज निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाऊन आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेतली. प्रभाग पद्धत नको, एक वॉर्ड एक उमेदवार अशा पद्धतीने निवडणूक प्रक्रिया राबवावी तसंच मतदानाच्या वेळी व्हीव्हीपॅटचा वापर करावा, अशी मागणी त्यांनी केली. पालिका निवडणुकीआधी विशेष पुनरिक्षण कार्यक्रम तातडीने राबवण्याची मागणी आपण निवडणूक अधिकाऱ्यांकडे करणार असल्याचं मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी सांगितलं.

<><><><>

नीती आयोगाने आज देशभरातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या १० हजारांपेक्षा जास्त अटल टिंकरिंग लॅबमधल्या विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यासाठी मेगा टिंकरिंग डेचं आयोजन केलं होतं. या कार्यक्रमात एकाच वेळी देशभरातल्या शाळांमधल्या साडे चार लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सहभाग घेतला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळेतल्या प्रयोगशाळांमध्ये उपलब्ध असलेल्या दैनंदिन साहित्याचा वापर करून डू इट यूअरसेल्फ पद्धतीने व्हॅक्युम क्लिनर तयार करण्याच्या प्रकल्पात सहभाग घेतला. आकांक्षी जिल्ह्यातल्या दुर्गम गावांमधल्या शाळाही या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या.

<><><><>

१८ व्या खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचं औपचारिक उद्घाटन आज मुंबईत होणार आहे. केंद्रसरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजय कुमार सूद, अणुविज्ञान विभागाचे सचिव डॉ. अजय कुमार मोहंती आणि आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघटनेचे माजी उपाध्यक्ष प्राध्यापक अजय केंभावी यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत ६४ देशांमधून एकंदर २८८ विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती स्पर्धेची आयोजक संस्था असलेल्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे संचालक प्राध्यापक अर्णब भट्टाचार्य यांनी काल वार्ताहर परिषदेत दिली.

<><><><>

नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या जागतिक महिला वेगवान बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताची ग्रँडमास्टर दिव्या देशमुख ने काल चीनच्या लेई टिंगजी ला १०-३ असं

हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. दिव्याने नुकतीच जॉर्जिया इथं झालेली फिडे विश्वचषक स्पर्धा जिंकून इतिहास घडवला होता. उपांत्य फेरीत येत्या गुरुवारी तिचा मुकाबला चीनची ग्रँडमास्टर हाउ यीफान हिच्याशी होणार आहे.

//<><><><>//